गुरूवार
१९
मार्च २०२६

वर्ष १९ वे
अंक - ६९
पाने - १२
किंमत - ०६ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

गुढी पाडव्याच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा !



# दैनिक युवावार्ता वर्धापन दिनानिमित्त...

विशेष संपादकीय

युवा उद्योग समूह, संगमनेर

## संगम - युवावार्ता : ३७ वर्षांची समाजाभिमुख पत्रकारितेची वाटचाल

दैनिक युवावार्ता १९ वर्षे पूर्ण करून पुढील वर्षात वाटचाल करीत असताना या वाटचालीविषयी अधिक बोलावे म्हणून हितगुज करीत आहोत. प्रसार माध्यम क्षेत्रातील बदल अतिशय वेगाने होत असून त्यामध्ये पारंगत राहून वृत्तपत्र प्रसिद्ध करणे हे एक नवीन आव्हान दैनिक युवावार्ताने स्वीकारले आहे. साप्ताहिक संगम संस्कृती वृत्तपत्राद्वारे पत्रकारितेचा श्रीगणेशा करून ३७ वर्षे होत असताना वाचकांनी दिलेले प्रेम, सहकार्य, जाहिरातदाराने दिलेला आर्थिक आधार यामुळेच दैनिक युवावार्ता सामाजिक भूमिका स्वीकारून परिवर्तनाच्या विचाराने वाटचाल करीत आहे. जेव्हा संगणकीय तंत्रज्ञान कार्यरत झाले तेव्हापासून संपर्क क्षेत्रात झालेले बदल आणि मोबाईल क्षेत्रात झालेली क्रांती यामुळे प्रिंट मीडिया सोशल मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया यांचे एकत्रित कार्य स्वीकारून दैनिक युवावार्ता वाचकांना प्रति प्रामाणिक राहून व सामाजिक प्रश्नांसाठी आग्रही भूमिका घेऊन लेखन करीत आलेला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील वेगवान बदल, निवडणुकांद्वारे झालेले राजकीय बदल आणि समाज जीवनामध्ये होणारे बदल निरीक्षण करीत असता योग्य काय आहे? गरजेचे काय आहे? सत्य काय आहे? हे जनतेला सांगण्याचा आमचा प्रयत्न सातत्याचा आहे. चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असलेले प्रशासक राज संपुष्टात आले आणि लोकप्रतिनिधींनी या संस्थांचा कारभार हातात घेतला आहे संगमनेरचे सुपुत्र आणि नामवंत तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांना मिळालेला पद्मश्री हा कलाक्षेत्रास व संगमनेरकरांना आनंद देणारा प्रसंग आहे. अहिल्यानगर जिल्हा सहकाराचा बालेकिल्ला म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे. जिल्ह्यातील सहकार समृद्ध असल्याने सत्तेची केंद्रे सहकारास्थित झालेली आहे, असे असले तरी परिवर्तन हा निसर्ग चा नियम आहे. म्हणून सामान्य कुटुंबातील डॉक्टर किरण लहामटे दोन वेळा आमदार झाले आणि अमोल खताळ संगमनेरचे आमदार झाले. निलेश लंके एकदा आमदार आणि एकदा खासदार झाले. या व्यक्तींना फारशी राजकीय परंपरा नसतानाही त्यांनी मिळवलेलं सामाजिक यश हेही महत्वाचे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील वाढणाऱ्या गुन्हेगारीचे आणि अनैतिक व्यवसायाचे केंद्रे उध्वस्त करण्यात पोलिसांना काही अंशी यश आलेले असले तरी हे प्रकार पूर्णतेने थांबलेले नाहीत. म्हणून नागरिकांनी त्यांच्या आसपास किंवा दृष्टिक्षेपात कोणतीही अवैध घटना किंवा गुन्हेगारी दिसत असेल तर सोशल मीडियाद्वारे त्यास वाचा फोडली तर पोलिसांना आणि सत्ताधाऱ्यांना त्याची नोंद घ्यावी लागते. हा प्रसार माध्यमांचा प्रभाव आहे. दैनिक युवावार्ता प्रसार माध्यम समूह म्हणून विविध क्षेत्रातील व्यक्ती आणि उद्योगांचे कार्य, विविध सामाजिक संस्थांचे कार्य आणि कृषी क्षेत्रात होणारे बदल यांची नोंद घेऊन दिशादर्शक प्रसारण सातत्याने करीत आहे.

संगमनेरमार्गे नाशिक-पुणे रेल्वे मार्ग हा पुढील पिढ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असल्याने दैनिक युवावर्तने या कार्यासाठी विशेष महत्त्व देऊन सहभागी होऊन हा प्रकल्प झालाच पाहिजे यासाठी ठाम भूमिका घेतली आहे. संगमनेरमार्गे नाशिक-पुणे रेल्वे मार्ग हा वास्तव योग्य भूमिकेतूनच होऊ शकतो त्यासाठी कोणत्याही पुढाऱ्यांनी त्यामध्ये राजकारण आणणे योग्य नाही. जे सत्य आहे योग्य आहे आणि नैसर्गिक आहे अशा पद्धतीनेच हा रेल्वे मार्ग होणे अत्यंत गरजेचे आहे. पुढाऱ्यांच्या भांडणात हा रेल्वे मार्ग रखडणार असेल तर जनतेने हा प्रश्न ऐरणीवर घेऊन सामूहिक लढा देणे अत्यंत गरजेचे आहे. आज उपलब्ध असणाऱ्या सर्व मार्गांवर होणारी गर्दी आणि रखडणारी वाहतूक हा नव्याने ज्वलंत प्रश्न निर्माण होत आहे आणि त्यासाठी नवीन रस्ते आणि रेल्वे मार्ग होणे अत्यंत गरजेचे असल्याची भूमिका दैनिक युवावार्ताने सातत्याने मांडली आहे. सामाजिक बांधिलकीची भूमिका घेऊन लिखाण करत असताना काही प्रसंगी आमचे लिखाण कुणाला टोचले तर त्याचा त्रासही सहन करावा लागतो. प्रसंगी कायदेशीर बाबींना सामोरे जावे लागते. यामध्ये दैनिक युवावार्तावर निर्माण झालेल्या सामाजिक अडचणींमध्ये वाचकांनी आणि हितचिंतकांनी त्याचबरोबर प्रसार माध्यमातील मित्रांनी केलेले सहकार्य सुद्धा उल्लेखनीय आहे. प्रसार माध्यमक्षेत्रे जनतेचा आवाज म्हणून काम करीत असताना जर काही अवैध शक्ती विरोधाचा दबाव निर्माण करत असतील, तेव्हा जनतेने-वाचकांनी वृत्तपत्रास पाठबळ देणे गरजेचे असते. असे घडले तर प्रशासन यंत्रणा आणि दबाव निर्माण करणारी यंत्रणा यांना योग्य तो संदेश पोहोचतो. सोशल मीडियाने संपर्क क्षेत्रात, प्रसार माध्यम क्षेत्रात, तंत्रज्ञानात प्रचंड प्रगती केली आहे. या प्रगतीला अधिक वेगवान करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही जोडीला आलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये अनेक प्रकारची सोय होत असताना काही गैरसोयीही निर्माण होत आहेत याची जाणीव दैनिक युवावार्ता परिवारास आहे. विशेषतः मोबाईल द्वारे लहान मुलांवर-युवकांवर होणारे वेगवेगळे दुष्परिणाम, व्हाट्सअप, इन्स्टा, फेसबुक द्वारे होणारे सायबर क्राईम, फसवणूक, अफवा आणि हिंसाचार या बाबी काळजी निर्माण करणाऱ्या आहेत. अशा प्रसंगी नवीन तंत्रज्ञानाबरोबर असणारे फायदे व तोटे यांचा विचार करत असताना कमीत कमी त्रासामध्ये हे तंत्रज्ञान वापरत आणणे हाच त्यावरील योग्य उपाय आहे. त्यासाठी सामाजिक जनजागृती करण्याचे काम युवावार्ता जाणीवपूर्वक करीत आहे सोशल मीडियामुळे ज्ञानाचा आणि माहितीचा स्फोट झालेला आहे. तसेच बऱ्याच प्रसंगी सत्य बाजूला राहून, पूर्ण ज्ञान बाजूला राहून अनेक प्रसंगी अज्ञानाचे, अहंकाराचे, गैरवर्तनाचे आणि गैरव्यवहारचे प्रकार प्रसार माध्यम क्षेत्रातही सुरू झालेले आहे. युट्यूबद्वारे सुरू झालेले, पोर्टलद्वारे सुरू झालेले ब्लॉग अतिशय चांगली माहिती देतात पण त्याचबरोबर अज्ञानी लोकांनी स्वार्थासाठी त्याचा गैरवापर सुरू केल्याने रात्रीतून निर्माण झालेले संपादक आणि पत्रकार लोकांना अफवा पसरवणारी, चुकीची किंवा हिंसा पसवणारी माहिती देत असतील तर हे कृत्य प्रसारमाध्यम क्षेत्रास बदनामीकारक आहे. याच विचारांनी जेव्हा अफवा पसरवली जाते तेव्हा निर्माण होणारा हिंसाचार किंवा जातीयवाद हा समाजामध्ये प्रचंड नुकसान करणारा असतो. दैनिक युवावार्ता कोणतीही माहिती, बातमी प्रसारित करण्यापूर्वी त्यातील सत्यता, स्त्रोत आणि उपयुक्तता लक्षात घेऊनच वाचकांप्रती सतत प्रेम आणि बांधिलकी ठेवून वृत्तप्रसाराचं काम करीत आहे. विसाव्या वर्षात वाटचाल करीत असताना दैनिक युवावार्तास अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. दैनिक युवावार्ताने अनेक नवीन बदल स्वीकारले आहेत. लआधुनिक तंत्रज्ञानात आणि व्यवस्थापनात दैनिक युवावार्ता काम करत असताना वाचक - जाहिरातदार, सर्व सहकारी, संचालक, कुटुंब घटक, बातमीदार, छायाचित्रकार यांना बरोबर घेऊन समन्वयाने पुढील वाटचाल ही सामाजिक बांधिलकीने आणि परिवर्तनाच्या विचारांनी चालू राहील अशी खात्री व्यक्त करतो. या वर्धापन दिनानिमित्त आमच्या सर्व हितचिंतकांना सहकार्याबद्दल वाचकांना आणि जाहिरातदारांना धन्यवाद देतो.



**किसन भाऊ हासे**
संस्थापक, संपादक























बिजांकुर
रियल इस्टेट अँण्ड लँण्ड डेव्हलपर्स
Follow us on:
बिजांकुर रिअल इस्टेट अँड लँड डेव्हलपर्स प्रस्तुत
प्रीमियम निवासी व व्यावसायिक N.A. प्लॉटस्
मर्यादित प्लॉट्स उपलब्ध
गुढी पाडवा
शुभमुहुर्तावर
घुलेवाडी - आनंद नगर
फेज 17
नाशिक-संगमनेर
महामार्गापासून फक्त 300 मीटर
तहसील NA मंजूर प्लॉट्स
| 20 फूट रस्ता | कंपाउंड वॉल |
| लाईट | पाणी सुविधा |
घर बांधण्यासाठी व गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम पर्याय
आजच तुमचा स्वप्नातील बंगला साकार करा !
साईटचा पत्ता : महात्मा फुले हायस्कुल समोर, घुलेवाडी रोड, घुलेवाडी ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
ऑफिस पत्ता : बिजांकुर डेव्हलपर्स, मार्केट यार्ड, गाळा नं. ५६, यशोधन ऑफिस शेजारी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
आजच बुक करा.. तुमच्या स्वप्नातील बंगलो प्लॉट
BOOK NOW!
अधिक माहितीसाठी संपर्क:
अंकुश नरवडे - 8329022238

युवावार्ता स्पेशल

- सुदीप किसन हासे (M.E. Computer)

# डिजिटल क्रांतीचे ५० शिलेदार: सामान्य माणसाचे जीवन बदलणारी 'एआय' साधने

आज आपण अशा युगात आहोत जिथे तंत्रज्ञान केवळ सोयीचे साधन राहिले नसून ते प्रगतीचे इंजिन बनले आहे. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) म्हणजे एखादे जादूचे खेळणे नाही, तर तो तुमच्या हातातील असा एक 'अलादिनचा दिवा' आहे जो तुमच्या व्यवसायाला, शिक्षणाला आणि दैनंदिन कामाला गती देऊ शकतो. या लेखात आपण ५० अशा टूल्सची माहिती घेणार आहोत, जी तुम्ही आजच वापरू शकता.

**१. अष्टपैलू एआय असिस्टंट (General Knowledge & Assistance)**

हे टूल्स तुमच्यासाठी पर्सनल सेक्रेटरी, शिक्षक आणि सल्लागार म्हणून काम करतात.

- ChatGPT: हे जगातील सर्वात प्रगत चॅटबॉट आहे. तुम्ही याला ईमेल लिहायला लावू शकता किंवा अवघड कोडी सोडवायला सांगू शकता. मोबाइल आणि डेस्कटॉप दोन्हीवर उपलब्ध असून याचे मोफत व्हर्जन (GPT-4o) अतिशय सक्षम आहे.
- Google Gemini: गुगलचे हे एआय थेट इंटरनेटशी जोडलेले आहे. तुम्हाला ताजी माहिती हवी असेल, तर जेमिनी सर्वोत्तम आहे. हे पूर्णपणे मोफत असून मराठीत उत्तम उत्तरे देते.
- Microsoft Copilot: विंडोज संगणकावर हे इनबिल्ट येते. हे केवळ माहितीच देत नाही, तर मोफतमध्ये पेंटिंगसारखी चित्रेही बनवून देते.
- Claude: हे टूल अतिशय नैसर्गिक आणि सुरक्षित संवाद साधते. मोठे रिपोर्ट किंवा पीडीएफ फाईल्स वाचून त्यांचा सारांश काढण्यासाठी हे प्रसिद्ध आहे.
- Perplexity AI: हे एआय सर्च इंजिन आहे. गुगलसारखे निळे दुवे (Links) देण्याऐवजी, हे थेट प्रश्नाचे उत्तर संदर्भानुसार (Citations) देते.
- Grok: एलॉन मस्क यांच्या एक्स (X/Twitter) वरील हे एआय अतिशय विनोदी आणि थेट माहिती देण्यासाठी ओळखले जाते.
- Google AI Studio: ज्यांना स्वतःचे छोटे एआय मॉडेल बनवायचे आहे किंवा प्रगत कोडिंग करायचे आहे, त्यांच्यासाठी हे गुगलचे व्यासपीठ आहे.
- NotebookLM: तुमच्या स्वतःच्या नोट्स किंवा पुस्तके यात अपलोड करा. हे एआय तुम्हाला त्या नोट्सवर आधारित प्रश्न विचारते आणि तुमच्यासाठी 'ऑडिओ ओव्हरव्ह्यू' तयार करते.

**२. गुगलची स्मार्ट टूल्स (Google Ecosystem)**

दैनंदिन कामात गुगलची एआय टूल्स कशी वापरावीत?

- Google Lens: तुमच्या फोनचा कॅमेरा आता 'डोळे' बनला आहे. कोणत्याही वस्तूचा किंवा झाडाचा फोटो काढा, हे टूल त्याचे नाव आणि माहिती सांगते.
- Google Translate AI: हे केवळ शब्द भाषांतर करत नाही, तर वाक्याचा संदर्भ ओळखून अचूक मराठी रूपांतर करते.
- Google Docs AI (Help me write): डॉक्समध्ये टायपिंग करताना एआय तुम्हाला पुढचे वाक्य सुचवते किंवा संपूर्ण पत्र लिहून देते.
- Google Sheets AI: डेटा एंट्री करताना अवघड सूत्रे (Formulas) लक्षात ठेवण्याची गरज नाही; एआयला साध्या भाषेत सांगा, ते सूत्र तयार करून देईल.

**३. कला आणि डिझाइन (Image & Photo Editing)**

आता तासनतास एडिटिंग करण्याची गरज नाही.

- DALL-E: तुम्ही लिहिलेल्या वर्णनावरून हे एआय डोळ्यांचे पारणे फेडणारी चित्रे तयार करते.
- Midjourney: हे जगातील सर्वात उच्च दर्जाचे आर्ट जनरेटर आहे. व्यावसायिक चित्रकार याचा वापर कल्पनेला वास्तव रूप देण्यासाठी करतात.
- Leonardo AI: हे मोफत चित्रांसाठी उत्तम पर्याय आहे. यात दररोज १५० मोफत क्रेडिट्स मिळतात.
- Adobe Firefly: फोटोशॉप वापरणाऱ्यांसाठी हे वरदान आहे. फोटोतील कपडे बदलणे किंवा बॅकग्राउंड वाढवणे हे याने सेकंदात होते.
- Canva AI: साधे दुकानदारही आता प्रोफेशनल डिझायनर बनू शकतात. 'मॅजिक डिझाइन' पर्यायाने आपोआप पोस्टर्स तयार होतात.
- Remove.bg: कोणत्याही फोटोचा पार्श्वभाग (Background) पाच सेकंदात काढून टाकणारे हे सर्वात सोपे टूल आहे.
- Nano Banana (Gemini 3 Flash Image): हे गुगलचे नवीन टूल असून ते अतिशय वेगाने आणि अचूक चित्रे बनवण्यासाठी ओळखले जाते.




- Pixlr: ऑनलाइन फोटो एडिटिंगसाठी हे एआय टूल्सने सज्ज असे मोफत साधन आहे.
- Fotor AI: जुने, अंधुक फोटो स्वच्छ करण्यासाठी आणि रंग भरण्यासाठी याचा वापर होतो.
- Clipdrop: एका क्लिकवर फोटोतील नको असलेल्या वस्तू (उदा. कचरा किंवा अनोळखी व्यक्ती) काढून टाकण्यासाठी हे सर्वोत्तम आहे.

**४. व्हिडिओ आणि सादरीकरण (Video & Presentation)**

व्हिडिओ बनवणे आता सर्वांच्या आवाक्यात आहे.

- Runway ML: मजकुरावरून व्हिडिओ बनवण्याचे हे प्रगत साधन आहे.
- Pictory: तुमच्या ब्लॉग पोस्टचे किंवा लेखाचे आपोआप व्हिडिओमध्ये रूपांतर करते. ज्यांना कॅमेऱ्यासमोर यायला भीती वाटते त्यांच्यासाठी हे उत्तम आहे.
- Synthesia: यात एक एआय माणूस (Avatar) तुम्ही दिलेली स्क्रिप्ट वाचतो. ट्रेनिंग व्हिडिओसाठी याचा मोठा वापर होतो.
- CapCut AI: मोबाईलवर व्हिडिओ एडिटिंग करण्यासाठी हे सर्वोत्तम एआय आधारित ॲप आहे, ज्यात आपोआप सबटायटल्स येतात.
- Lumen5: सोशल मीडिया मार्केटिंगसाठी मजकुराचे व्हिडिओ बनवणारे सोपे टूल.
- InVideo AI: फक्त एका ओळीचा प्रॉम्प्ट द्या आणि पूर्ण व्हिडिओ (व्हॉइसओव्हरसह) तयार मिळवा.

**५. आवाज आणि संगीत (Audio & Music)**

- ElevenLabs: मानवी आवाजाशी मिळतेजुळते 'व्हॉइसओव्हर' तयार करण्यासाठी हे जगातील नंबर १ टूल आहे.
- Murf AI: व्यावसायिक जाहिरातींसाठी आवाज देण्यासाठी याचा वापर होतो.
- Speechify: तुमची पुस्तके किंवा नोट्स एआय आवाजात ऐकण्यासाठी हे विद्यार्थी आणि अंध व्यक्तींसाठी उपयुक्त आहे.
- Descript: व्हिडिओतील ऑडिओ एडिट करणे म्हणजे एखादा मजकूर एडिट करण्याइतके सोपे झाले आहे.
- Audacity AI: ऑडिओमधील गोंधळ (Noise) काढून टाकण्यासाठी नवीन एआय प्लगइन्स उपलब्ध आहेत.

**६. शिक्षण आणि विद्यार्थी (Student & Teacher Tools)**

- Photomath: गणिताचा प्रश्न स्कॅन करा आणि त्याचे उत्तर पायरी-पायरीने मिळवा.
- Wolfram Alpha: विज्ञानाशी संबंधित कठीण प्रश्नांची उत्तरे आणि आकडेवारी मिळवण्यासाठी हे तज्ज्ञांचे टूल आहे.
- Quizlet: एआयच्या मदतीने स्वतःच्या फ्लॅशकार्ड्स आणि टेस्ट सिरीज बनवा.
- Khan Academy (Khanmigo): हे विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक ट्यूटर (शिक्षक) म्हणून काम करते.
- Socratic: गुगलचे हे ॲप शालेय विद्यार्थ्यांच्या शंका त्वरित दूर करते.

**७. व्यावसायिक आणि हिशोब तपासणी (Accountants & Business)**

- Tally AI: आता टॅलीमध्ये एआय आधारित रिपोर्टिंग फिचर्स येत आहेत.
- Zoho Books AI: आपोआप इनव्हॉइस तयार करणे आणि खर्चाचे वर्गीकरण करण्यासाठी हे उपयुक्त आहे.
- Power BI: व्यवसायातील मोठ्या डेटाचे विश्लेषण करून नफा कसा वाढवावा, याचे आलेख तयार करते.
- Notion AI: तुमची सर्व कामे, मीटिंग्स आणि प्रोजेक्ट्स मॅनेज करण्यासाठी एआय सहाय्यक.

**८. शेती आणि निसर्ग (Agriculture Tools)**

- Plantix: पिकावरील रोगाचे निदान करण्यासाठी आणि औषध सुचवण्यासाठी हे जगातील सर्वात मोठे ॲप आहे.
- Kisan AI: सरकारी योजनांची माहिती शेतकऱ्यांच्या भाषेत देणारे चॅटबॉट.

**९. विशेष क्षेत्रांसाठी साधने (Legal, Medical & Architecture)**

- Ada Health: आजाराच्या लक्षणांवरून प्राथमिक माहिती देणारे मेडिकल एआय.
- Harvey AI: वकिलांसाठी केस स्टडीज शोधणारे प्रगत साधन.
- Planner 5D: आर्किटेक्ट्ससाठी घराचे डिझाइन एआयच्या मदतीने ३डी मध्ये बनवणारे टूल.
- RoomGPT: तुमच्या खोलीचा फोटो टाका, एआय तुम्हाला ती रूम कशी सजवता येईल (Interior Design) हे सुचवेल.
- Grammarly: इंग्रजी लेखन सुधारण्यासाठी आणि चुका दुरुस्त करण्यासाठी हे जागतिक दर्जाचे टूल आहे.
- DeepL: गुगल ट्रान्सलेटपेक्षाही अधिक प्रगत आणि नैसर्गिक भाषांतर करण्यासाठी हे वापरले जाते.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच ए.आय. (Artificial Intelligence) हे तंत्रज्ञान आज जगभरातील सर्वात वेगाने बदल घडवणारे क्षेत्र ठरत आहे. काही वर्षांपूर्वी एखाद्या संगणकाने माणसासारखे लिहिणे, बोलणे, चित्र तयार करणे, माहिती समजून घेणे किंवा निर्णय देणे ही कल्पना भविष्यकालीन वाटत होती; परंतु आज ती प्रत्यक्षात आपल्या हातातील मोबाईलमध्ये आली आहे. जगातील सर्व मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या आता एआय क्षेत्रात अब्जावधी डॉलरची गुंतवणूक करत आहेत. कारण पुढील काळात एआय हे फक्त सॉफ्टवेअर न राहता उद्योग, शिक्षण, वैद्यकीय सेवा, शेती, बँकिंग, कायदा, वाहतूक, संशोधन आणि दैनंदिन जीवनाचा मूलभूत भाग होणार आहे. आज ज्या वेगाने एआय विकसित होत आहे, त्या वेगाने मानवी कामकाजाची रचना बदलत आहे.

सध्या जागतिक स्तरावर एआय क्षेत्रात सर्वाधिक चर्चेत असलेली कंपनी म्हणजे OpenAI. या कंपनीने तयार केलेले ChatGPT हे साधन जगभरात सर्वसामान्य लोकांपर्यंत एआय पोहोचवणारे पहिले प्रभावी माध्यम ठरले. ChatGPT मुळे लेखन, भाषांतर, प्रश्नोत्तरे, माहिती विश्लेषण, कोडिंग, संशोधन, व्यावसायिक पत्रव्यवहार, शैक्षणिक सामग्री तयार करणे यासारखी अनेक कामे काही सेकंदांत शक्य झाली. याच कंपनीने DALL-E सारखे चित्रनिर्मिती करणारे मॉडेलही विकसित केले. OpenAI चे वैशिष्ट्य म्हणजे एआयला मानवी संवादासारखी भाषा देणे आणि त्याला विविध प्रकारच्या ज्ञानावर प्रशिक्षित करणे.

एआयच्या क्षेत्रात दुसरे महत्त्वाचे नाव म्हणजे Google. Google ने आपल्या संशोधन संस्था Google DeepMind मार्फत अत्यंत प्रगत एआय विकसित केले आहे. आज Google Gemini हे Google चे प्रमुख AI साधन आहे. Gemini केवळ प्रश्नांची उत्तरे देत नाही तर Gmail, Docs, Sheets, Search, Maps यांसारख्या सेवांशी थेट जोडलेले असल्यामुळे सामान्य वापरकर्त्याला प्रत्यक्ष कामात मदत करते. Google चे Google Lens हे साधन फोटोद्वारे वस्तू ओळखते, मजकूर translate करते, वनस्पतींची माहिती देते, तर NotebookLM संशोधनासाठी मोठी मदत करते. Google चे उद्दिष्ट AI ला प्रत्येक डिजिटल सेवेत समाविष्ट करणे आहे.

Microsoft ही कंपनी देखील एआय क्षेत्रात अत्यंत प्रभावी भूमिका बजावत आहे. Microsoft ने OpenAI मध्ये मोठी गुंतवणूक केली असून Word, Excel, PowerPoint आणि Windows मध्ये Microsoft Copilot समाविष्ट केले आहे. Copilot मुळे कार्यालयीन कामात मोठा बदल होत आहे. उदाहरणार्थ Excel मध्ये मोठा डेटा समजावून सांगणे, PowerPoint मध्ये presentation तयार करणे, Word मध्ये पत्र किंवा report तयार करणे हे आता AI मदतीने सहज शक्य झाले आहे. बँकिंग, अकाउंटिंग, उद्योग आणि प्रशासकीय कामात Microsoft चे AI साधन अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

एआयच्या विकासामागे हार्डवेअर क्षेत्रात सर्वात मोठी भूमिका NVIDIA या कंपनीची आहे. AI चालवण्यासाठी अत्यंत शक्तिशाली GPU chips आवश्यक असतात आणि जगातील बहुतांश AI मॉडेल्स NVIDIA च्या चिप्सवर प्रशिक्षित होतात. त्यामुळे NVIDIA ला आज एआय युगाचा पायाभूत पुरवठादार मानले जाते. AI मध्ये जितका वेग वाढतो तितकी NVIDIA ची भूमिका अधिक महत्त्वाची बनत आहे. डेटा सेंटर, cloud infrastructure आणि AI supercomputing मध्ये ही कंपनी केंद्रस्थानी आहे. Meta म्हणजेच Facebook ची कंपनी देखील एआयमध्ये मोठ्या प्रमाणात काम करत आहे. Meta ने LLaMA नावाची open-source AI मॉडेल्स विकसित केली आहेत. यामुळे संशोधक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक संस्था स्वतःची AI प्रणाली विकसित करू शकतात. Meta चे उद्दिष्ट social media, virtual reality आणि future digital interaction मध्ये AI समाविष्ट करणे आहे. भविष्यात Meta चे AI अधिक वैयक्तिक संवाद आणि immersive अनुभव देऊ शकते.

Amazon ने cloud computing आणि AI यांचा मोठा संगम घडवला आहे. Amazon Web Services (AWS) वर आज अनेक AI कंपन्या आपली मॉडेल्स चालवतात. याशिवाय Alexa, customer service automation, product recommendation यांसारख्या सेवांमध्ये AI मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. Amazon चे AI retail, logistics आणि e-commerce मध्ये मोठे बदल घडवत आहे. Anthropic या कंपनीचे Claude हे मॉडेल सुरक्षित आणि नियंत्रित एआय म्हणून प्रसिद्ध होत आहे. Claude मोठे documents वाचून समजून घेण्यात अत्यंत सक्षम आहे. संशोधन, कायदा, धोरणात्मक विश्लेषण आणि मोठ्या माहितीच्या संकलनासाठी हे उपयुक्त मानले जाते.

xAI ही Elon Musk यांनी स्थापन केलेली कंपनी आहे. यांचे Grok हे AI साधन social media आधारित ताज्या माहितीवर आधारित उत्तर देण्यासाठी ओळखले जाते. भविष्यात Grok हे real-time माहिती देणारे प्रभावी AI साधन ठरू शकते.

पुढील पाच वर्षांत एआयमध्ये सर्वात मोठा बदल म्हणजे AI agents चा उदय होणार आहे. आज AI ला प्रश्न विचारल्यावर उत्तर मिळते; परंतु पुढे AI स्वतः काम करणारी प्रणाली बनेल. उदाहरणार्थ तुम्ही "माझ्यासाठी पुढील महिन्याचा विक्री अहवाल तयार करा" असे सांगितल्यावर AI स्वतः डेटा घेईल, विश्लेषण करेल, chart तयार करेल आणि presentation देईल. उद्योग, बँकिंग, कार्यालयीन काम आणि संशोधन क्षेत्रात हे मोठे परिवर्तन ठरेल.

शिक्षण क्षेत्रात पुढील काही वर्षांत प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक AI शिक्षक मिळू शकतो. AI विद्यार्थ्याच्या शिकण्याच्या पद्धतीनुसार वेगळा अभ्यासक्रम तयार करेल. शिक्षकांसाठी lesson plan, परीक्षा प्रश्नपत्रिका, visual presentation आणि language support सहज मिळेल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण डिजिटल शिक्षण उपलब्ध होऊ शकते.

वैद्यकीय क्षेत्रात AI निदान प्रक्रियेत मोठी मदत करेल. X-ray, MRI, pathology report, blood analysis यामध्ये AI प्राथमिक स्तरावर डॉक्टरांना संकेत देईल. त्यामुळे निदान वेगवान आणि अचूक होऊ शकते. औषध संशोधनातही AI मोठी भूमिका बजावेल.

शेतीमध्ये AI मुळे हवामान अंदाज, माती विश्लेषण, रोग ओळख, पाणी व्यवस्थापन आणि उत्पादन अंदाज अधिक अचूक होतील. शेतकरी मोबाईलवर फोटो काढून पिकावरील रोग समजू शकेल. बँकिंग क्षेत्रात AI fraud detection, ग्राहक सेवा आणि risk analysis मध्ये वापरले जाईल.

फोटो, व्हिडिओ आणि डिझाइन क्षेत्रात AI मुळे सर्जनशीलता अधिक वेगाने वाढेल. एखादा सामान्य माणूस काही शब्द लिहून उच्च दर्जाचे चित्र तयार करू शकेल, आवाज बदलू शकेल, व्हिडिओ तयार करू शकेल आणि जाहिरात डिझाइन करू शकेल. त्यामुळे creative economy मध्ये मोठे बदल होणार आहेत.

येत्या काळात एआयमुळे काही नोकऱ्यांचे स्वरूप बदलेल, काही कामे automation कडे जातील; परंतु नवीन कौशल्यांची गरज निर्माण होईल. जो व्यक्ती AI समजून घेईल आणि वापरेल तो अधिक सक्षम ठरेल. इंटरनेट जसे एकदा सर्वांसाठी आवश्यक झाले तसे पुढील काळात AI देखील प्रत्येक क्षेत्रात आवश्यक होणार आहे.

म्हणूनच आजचा काळ हा AI समजून घेण्याचा आहे. भविष्यात AI हे केवळ तंत्रज्ञान न राहता मानवी कामकाजातील सहकारी शक्ती बनेल. पुढील पाच वर्षांत जगातील स्पर्धा AI भोवती केंद्रित होणार आहे आणि सामान्य माणसाच्या जीवनातही त्याचे परिणाम स्पष्ट दिसू लागतील.

# श्री लिंगेश्वर देवस्थान, लिंगदेव श्री लिंगेश्वर महादेव यात्रा उत्सव









अकोले तालुक्यातील पवित्र आणि ऐतिहासिक स्थळ म्हणून ओळखले जाणारे श्री क्षेत्र लिंगदेव येथे भगवान श्री लिंगेश्वर महादेवांची वार्षिक यात्रा दरवर्षी चैत्र शुद्ध प्रतिपदा – गुढीपाडवा या शुभदिनी अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी केली जाते. अकोले तालुक्यातील सर्वात मोठा आणि भव्य धार्मिक उत्सव म्हणून या यात्रेची ख्याती असून, या दिवशी महाराष्ट्राच्या विविध भागांतून सुमारे ३ ते ४ लाख भाविक भगवान श्री लिंगेश्वराचे दर्शन घेण्यासाठी आणि उत्सवात सहभागी होण्यासाठी येथे एकत्र येतात. धार्मिक परंपरा, सांस्कृतिक वैभव आणि लोकपरंपरांचा संगम असलेला हा यात्रा उत्सव विविध कार्यक्रमांनी सजलेला असतो.

**महापूजा**

गुढीपाडव्याच्या दिवशी पहाटे सकाळी ४.०० वाजता भगवान श्री लिंगेश्वर महादेवांची महापूजा मोठ्या भक्तिभावाने सुरू होते. मंदिरातील पुजारी व मानकरी यांच्या उपस्थितीत ही पूजा सुमारे दीड तास चालते. या वेळी मंदिर परिसरात अत्यंत पवित्र आणि भक्तिमय वातावरण निर्माण होते.

**मुखवटा व वस्त्रालंकार**

सकाळी ६.०० वाजता भगवान श्री लिंगेश्वरांना पारंपरिक मुखवटा चढविण्याचा सोहळा पार पडतो. त्यानंतर देवाला विविध दागिने आणि अलंकारांनी सजवले जाते.

चौसरा, चंद्रहार, चौकडे, कुंडले, पगरे, बिगबाळ्या अशा अनेक पारंपरिक सोन्याच्या दागिन्यांनी देवाची भव्य सजावट केली जाते. हे दागिने अनेक पिढ्यांपूर्वी तयार केलेले असून देवस्थानची ऐतिहासिक परंपरा दर्शवतात. देवाला वस्त्र आणि अलंकार चढविण्याचा मान लिलावाद्वारे निवडलेल्या भक्ताला मिळतो.

**महाआरती**

सकाळी ठीक ७.०० वाजता भगवान श्री लिंगेश्वर महादेवांची भव्य महाआरती संपन्न होते. लिलावामध्ये सर्वाधिक रक्कम अर्पण करणाऱ्या भक्ताच्या हस्ते ही आरती करण्याचा मान मिळतो. हजारो भाविकांच्या उपस्थितीत, घंटानाद आणि मंत्रोच्चारांमध्ये ही आरती अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडते.

ऋतुमान उकल विधी

यात्रेच्या आदल्या दिवशी पारंपरिक आढे विधी पार पाडला जातो. जमिनीत लहान खड्डे करून त्यामध्ये मोजून धान्य ठेवले जाते. यात्रेच्या दिवशी सकाळी ८.०० वाजता हे आढे उघडले जातात. पुजारी या धान्याच्या स्थितीवरून आगामी वर्षातील पर्जन्यमान, ऋतूमानातील बदल आणि पिकांवर होणाऱ्या किडीचा अंदाज भाविकांना सांगतात. ही परंपरा अनेक वर्षांपासून जपली जात आहे.

**भगवान श्री लिंगेश्वरास मानवंदना**

सकाळी ९.०० वाजता भगवान श्री लिंगेश्वरांना विविध पारंपरिक वाद्यांच्या गजरात मानवंदना दिली जाते. लेझीम पथक, ढोल–ताशा, सनई, संबळ, डीजे तसेच विविध पारंपरिक नृत्यांच्या माध्यमातून सुमारे एक ते दीड तास हा सोहळा रंगतो. त्यानंतर भगवान श्री लिंगेश्वरांची भव्य शोभायात्रा काढली जाते. ग्रामप्रदक्षिणा करत संपूर्ण गावातून ही मिरवणूक अत्यंत उत्साहात पार पडते.

**लेझीम स्पर्धा**

यात्रेच्या दिवशी दुपारी १२.०० ते ४.०० या वेळेत भव्य लेझीम स्पर्धांचे आयोजन केले जाते. अहमदनगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यातील नामांकित लेझीम संघ यात सहभागी होतात. विजयी संघांना रोख पारितोषिके आणि स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात येते. या स्पर्धांमुळे पारंपरिक खेळांना प्रोत्साहन मिळते तसेच भाविकांचे मनोरंजनही होते.

**संगीत आखाडी (बोहडा)**

यात्रेतील सर्वात आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम म्हणजे संगीत आखाडी अर्थात बोहडा. हा कार्यक्रम सायंकाळी ७.०० ते सकाळी ७.०० असा तब्बल १२ तास अखंड चालतो. महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेला हा बोहडा पाहण्यासाठी लाखो भाविक लिंगदेव येथे उपस्थित राहतात.

या आखाडीत विष्णुपुराण, रामायण आणि महाभारत यांमधील विविध प्रसंगांचे सादरीकरण केले जाते.

सुत्रधार, गणपती, सरस्वती, मत्स्य अवतार, कूर्म अवतार, वराह अवतार, नरसिंह अवतार, राम–लक्ष्मण, शूर्पणखा, त्राटिका, हनुमान, कुंभकर्ण, इंद्रजीत, रावण, श्रीकृष्ण, अर्जुन, भीष्म, मोहिनीराज, यमराज, सत्यवान–सावित्री, रक्तादेवी, वेताळ, खंडेराय, म्हाळसा, वाघ्यामुरळी, महादेव–पार्वती, वीरभद्र, अभिमन्यू, घटोत्कच अशा अनेक पौराणिक पात्रांची पथनाट्य स्वरूपात सोंगे सादर केली जातात. या सादरीकरणाला संबळ, डफ, सनई यांची पारंपरिक संगीत साथ असते.

या सोंगांच्या लिलावातून सुमारे १५ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमा होते. या कार्यक्रमासाठी लागणारे मुखवटे, पोशाख, सजावट, मेकअप, संगीत आणि प्रकाशयोजना देवस्थान संस्थेकडून उपलब्ध करून दिली जाते.

**उद्घाटन व दीपप्रज्वलन**

संगीत आखाडीचे उद्घाटन सायंकाळी ६.०० वाजता केले जाते. उद्घाटन आणि दीपप्रज्वलन यासाठी देखील लिलाव घेतला जातो आणि हा लिलाव १ लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेपर्यंत पोहोचतो.

**देणग्यांचा वर्षाव**

यात्रेच्या दिवशी दिवसभर आणि रात्रभर भाविकांकडून देणग्यांचा वर्षाव होत असतो. देवावरील श्रद्धा आणि देवस्थानच्या कार्यामुळे दरवर्षी सुमारे १० लाख रुपयांपर्यंत देणगी प्राप्त होते. मंदिर परिसरात भव्य लाईटिंग, सजावट आणि रंगरंगोटी करण्यात येते. रात्रभर फटाक्यांची आतषबाजी आणि शोभेचे दारूकाम सुरू असते. यात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणात पोलीस, होमगार्ड व दक्षता पथकांचा बंदोबस्त ठेवण्यात येतो.

**हगामा (कुस्त्यांची दंगल)**

यात्रेच्या दुसऱ्या दिवशी जंगी हगामा अर्थात कुस्त्यांची दंगल आयोजित केली जाते. कोल्हापूर, सातारा, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील नामांकित कुस्तीगीर या स्पर्धेत सहभागी होतात. काही कुस्त्यांसाठी ११,००० रुपयांपर्यंत इनाम ठेवले जाते. त्यामुळे हा कार्यक्रमही यात्रेतील प्रमुख आकर्षण ठरतो.

अशा प्रकारे धार्मिक परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि लोककलांचा अद्वितीय संगम असलेला श्री लिंगेश्वर महादेव यात्रा उत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून अकोले तालुक्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला आहे. लाखो भाविकांच्या उपस्थितीत हा उत्सव दरवर्षी अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडतो.

शब्दांकन -
**डी. बी. फापाळे सर**
संस्थापक-अध्यक्ष,
श्री लिंगेश्वर महादेव व
मारूती देवस्थान ट्रस्ट, लिंगदेव

















# स्मार्ट अकॅडमी : यशाकडे नेणारा विश्वासार्ह मार्ग

## JEE, NEET, MHT-CET साठी अकोल्यातील अग्रगण्य कोचिंग इन्स्टिट्यूट

अकोले तालुक्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्पर्धा परीक्षांची सक्षम तयारी आणि उज्ज्वल करिअरचा विश्वासार्ह मार्ग म्हणजे स्मार्ट अकॅडमी. गेल्या नऊ वर्षांपासून सातत्याने विद्यार्थ्यांच्या यशासाठी कार्यरत असलेली ही संस्था आज तालुक्यात एक प्रतिष्ठित आणि विश्वासार्ह शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखली जाते. "Your Success is Our Priority" हे ब्रीदवाक्य केवळ शब्दांपुरते मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष कृतीत उतरवत प्रा. संग्राम भाऊसाहेब मालुंजकर सरांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांप्रमाणेच दर्जेदार स्पर्धात्मक शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

आजच्या काळात इयत्ता ११ वी आणि १२ वी सायन्स या टप्प्यावर विद्यार्थ्यांच्या भविष्यातील करिअरची दिशा निश्चित होत असते. डॉक्टर, इंजिनिअर, संशोधक किंवा इतर व्यावसायिक क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर JEE, NEET आणि MHT-CET सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी अत्यंत नियोजनबद्ध आणि योग्य मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक ठरते. हीच गरज ओळखून स्मार्ट अकॅडमीमध्ये ११ वी आणि १२ वी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे, ज्यामध्ये बोर्ड परीक्षांसह स्पर्धा परीक्षांचा विचार करून सुरुवातीपासूनच अभ्यासाची दिशा ठरवली जाते.

### गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नऊ वर्षांची परंपरा

स्मार्ट अकॅडमी ही केवळ एक कोचिंग क्लास नसून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतेचा विकास करणारे आणि त्यांना यशासाठी सक्षम बनवणारे सर्वसमावेशक शैक्षणिक व्यासपीठ आहे. गेल्या ९ वर्षांत या संस्थेने शेकडो विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये मार्गदर्शन केले असून अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे.

विशेष बाब म्हणजे स्मार्ट अकॅडमीचेच विद्यार्थी सलग अनेक वर्षे १२ वी बोर्ड, MHT-CET आणि JEE Main या परीक्षांमध्ये अकोले तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत आहेत. ही बाब संस्थेच्या दर्जेदार अध्यापनाची आणि सातत्यपूर्ण मेहनतीची साक्ष देते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहरातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत मिळवलेले हे यश तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.



प्रा. संग्राम मालुंजकर सर


संस्थेतील अध्यापन पद्धती संकल्पनाधारित आहे. प्रत्येक विषयातील मूलभूत तत्त्वे सखोल समजावून सांगितली जातात. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना तत्काळ उत्तर देणे, पुनरावृत्ती करून आत्मविश्वास निर्माण करणे आणि स्पर्धा परीक्षांच्या पद्धतीनुसार प्रश्नसंच सोडवणे यावर विशेष भर दिला जातो.

### अनुभवी नेतृत्व – २३ वर्षांचा समृद्ध अध्यापन अनुभव

स्मार्ट अकॅडमीचे संस्थापक प्रा. संग्राम भाऊसाहेब मालुंजकर सर हे शिक्षणक्षेत्रातील अत्यंत अनुभवी आणि समर्पित व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना २३ वर्षांचा अध्यापनाचा समृद्ध अनुभव असून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून यशाचा मार्ग दाखवला आहे.

त्यांनी पुण्यातील अनेक प्रतिष्ठित संस्थांमध्ये अध्यापन केले आहे. विशेषतः PICT, VIT आणि Sinhgad Institutes यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये अध्यापनाचा अनुभव घेतल्यामुळे त्यांना स्पर्धात्मक शिक्षणपद्धती, विद्यार्थ्यांच्या मानसिक तयारीचे स्वरूप आणि उच्च शिक्षणाच्या अपेक्षा यांची सखोल जाण आहे.

मोठ्या शहरांमध्ये उपलब्ध असलेली शिक्षणाची गुणवत्ता ग्रामीण भागात पोहोचवण्याचा त्यांचा ध्यास आहे. त्यामुळेच त्यांनी अकोले तालुक्यातस्मार्ट अकॅडमीची स्थापना करून स्थानिक विद्यार्थ्यांना मोठ्या शहरात न जाता दर्जेदार शिक्षणाची संधी दिली.




### प्रत्येक विषयासाठी तज्ञ शिक्षकांची सक्षम टीम

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी एकाच शिक्षकावर अवलंबून राहणे पुरेसे नसते. त्यामुळे स्मार्ट अकॅडमीमध्ये प्रत्येक विषयासाठी दोनपेक्षा अधिक तज्ञ आणि अनुभवी शिक्षकांची टीम कार्यरत आहे.

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या अध्यापन शैलींचा लाभ मिळतो. प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्यांना संकल्पना वेगवेगळ्या उदाहरणांनी समजावून सांगतो, त्यामुळे कठीण विषय देखील सोपे वाटू लागतात. नियमित डाऊट सॉल्व्हिंग सत्रे, विषयवार टेस्ट आणि वैयक्तिक शंका निरसन यामुळे विद्यार्थ्यांची पकड मजबूत होते.

### आधुनिक सुविधा – शिक्षणात तंत्रज्ञानाची जोड

आजच्या स्पर्धात्मक युगात आधुनिक पायाभूत सुविधा विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला अधिक प्रभावी बनवतात. स्मार्ट अकॅडमीमध्ये उपलब्ध सुविधा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त आहेत:

- वातानुकूलित (AC) वर्गखोल्या
- डिजिटल क्लासरूम
- सुसज्ज प्रयोगशाळा
- स्वतंत्र अभ्यास कक्ष
- CCTV देखरेख
- वाचनालय सुविधा

प्रयोगशाळेमध्ये प्रत्यक्ष प्रयोग करून शिकवले जाते, ज्यामुळे केवळ सिद्धांत न राहता संकल्पना अनुभवातून समजतात.

वाचनालयात विविध संदर्भग्रंथ, मागील प्रश्नपत्रिका आणि स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध आहे.

### शिस्तबद्ध अभ्यास आणि नियमित मूल्यमापन

स्पर्धा परीक्षांमध्ये यशाचा पाया म्हणजे सातत्यपूर्ण सराव. स्मार्ट अकॅडमीमध्ये नियमितपणे टेस्ट सिरीज घेतल्या जातात. प्रत्येक टेस्टनंतर विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेचे विश्लेषण करून त्यांच्या चुका दाखवून दिल्या जातात. यामुळे विद्यार्थी स्वतःची प्रगती मोजू शकतात. पालकांसाठी उपस्थिती संदेश सुविधा उपलब्ध असल्यामुळे पालक आणि संस्था यांच्यात सतत संवाद राहतो.

### करिअर मार्गदर्शन – शिक्षणासोबत योग्य दिशा

फक्त अभ्यास पुरेसा नसतो; योग्य करिअर निवडण्यासाठी योग्य माहिती आवश्यक असते. यासाठी स्मार्ट अकॅडमीने मागील वर्षी विशेष करिअर मार्गदर्शन उपक्रम आयोजित केला ज्यामध्ये देशातील सहा महत्त्वाच्या विद्यापीठांचा सहभाग होता.

या मार्गदर्शन सत्रामध्ये खालील प्रतिष्ठित विद्यापीठांचा समावेश करण्यात आला:

- Parul University
- Amity University
- FLAME University
- Universal AI University
- MIT World Peace University
- Sanjivani University

या सत्रांमुळे विद्यार्थ्यांना विविध करिअर पर्याय, अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया आणि भविष्यातील संधी यांची सखोल माहिती मिळाली.

### ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी

इयत्ता १० वी नंतर एकात्मिक प्रवेश सुविधा उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचतो. बोर्ड आणि स्पर्धा परीक्षा एकाच ठिकाणी व्यवस्थित तयारीने पूर्ण करता येतात.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी होस्टेल सुविधा उपलब्ध असल्यामुळे दूरच्या विद्यार्थ्यांनाही चांगले वातावरण मिळते.

### यशाची परंपरा पुढेही कायम

स्मार्ट अकॅडमीने अल्पावधीतच स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. नऊ वर्षांची सातत्यपूर्ण परंपरा, अनुभवी नेतृत्व, आधुनिक सुविधा, तज्ञ शिक्षक आणि विद्यार्थ्यांवरील वैयक्तिक लक्ष यामुळे ही संस्था अकोले तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी विश्वासाचा आधार बनली आहे.

प्रा. संग्राम मालुंजकर सर यांचा एक स्पष्ट विश्वास आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्षमता कमी नसते; योग्य दिशा आणि योग्य शिक्षक मिळाले तर ते कोणत्याही मोठ्या शहरातील विद्यार्थ्यांपेक्षा कमी नाहीत. हीच भावना स्मार्ट अकॅडमीच्या प्रत्येक उपक्रमात दिसून येते.

**"Your Success is Our Priority"** हे ब्रीदवाक्य जपत स्मार्ट अकॅडमी पुढील काळातही अनेक डॉक्टर, इंजिनिअर, संशोधक आणि यशस्वी विद्यार्थी घडवत राहील, यात शंका नाही.

शब्दांकन -
किशोर एकनाथ आव्हाड
पत्रकार, दैनिक युवावार्ता










# गुढीपाडव्याच्या पावन पर्वावर श्री क्षेत्र लिंगदेव येथे श्री लिंगेश्वर महादेव भव्य यात्रा महोत्सव

१९ मार्च २०२६ रोजी येणारा गुढीपाडवा हा हिंदू नववर्षाचा प्रारंभ मानला जाणारा अत्यंत पवित्र आणि मंगलमय दिवस आहे. या शुभदिनी ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथील श्रीक्षेत्र लिंगदेव येथे स्वयंभू व अत्यंत जागृत देवस्थान असलेल्या श्री लिंगेश्वर महादेवाचा भव्य यात्रा महोत्सव सालाबादप्रमाणे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा केला जाणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सुविख्यात असलेल्या या यात्रेला ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व लाभलेले असून दरवर्षी लाखो भाविक या पवित्र स्थळी दर्शनासाठी दाखल होत असतात.

यात्रेच्या दिवशी लिंगदेव गावात भक्तांची प्रचंड गर्दी उसळते. गावात व परिसरात वाहनांना जागा अपुरी पडते, इतका मोठा जनसागर येथे उसळलेला असतो. भगवान श्री लिंगेश्वर महादेव यांच्यावर असलेल्या अपार श्रद्धेमुळे अनेक भाविक येथे संकल्प करतात. भगवानाच्या कृपेने संकल्प सिद्ध होत असल्याचा अनुभव भाविकांना येत असल्याने नवस फेडण्यासाठी आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी यात्रेत पाहायला मिळते.

### पहाटेपासून धार्मिक विधींना प्रारंभ

यात्रेच्या दिवशी पहाटे ४ ते ५ वाजता भगवान श्री लिंगेश्वराची महापूजा अत्यंत विधिवत संपन्न होते. या पूजेचा लिलाव श्री. पवार यांनी रूपये ३७,०००- या रकमेला गेला. त्यानंतर भगवान श्री लिंगेश्वराला आकर्षक अलंकार चढविण्याचा सोहळा पार पडतो. अलंकारानंतर महाआरतीचा मंगलमय कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. महाआरती श्री. हृषीकेश दगडू पवार यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. त्यांनी हा लिलाव रूपये ७२,०००- रकमेला घेतला.

महाआरतीनंतर पारंपरिक पद्धतीने 'ऋतुमान' सांगितले जाते. यामध्ये आगामी वर्षातील पावसाचे प्रमाण, पिकांची स्थिती, धान्यावरील किड, भाववाढ यांसारख्या बाबींचा पारंपरिक अंदाज व्यक्त केला जातो. गावकरी आणि शेतकरी या विधीला विशेष महत्त्व देतात.

### भव्य शोभायात्रेची रंगत

धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर सकाळी गावातून भगवान श्री लिंगेश्वराच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात येते. बँड, सनईचा ताफा, भजनी मंडळे, लेझीम पथके आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही शोभायात्रा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडते. हजारो गावकरी आणि भाविक यात सहभागी होत भक्तीचा अनोखा सोहळा अनुभवतात.

यावर्षी सकाळी ९ ते ११ या वेळेत ढोल-ताशा पथकाचा देखणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून त्यानंतर ११ ते १२ या वेळेत शालेय विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.

### भव्य लेझीम स्पर्धेने यात्रेला विशेष रंगत

यात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे दुपारी १२ ते ३ या वेळेत होणारी भव्य लेझीम स्पर्धा. या स्पर्धेत संगमनेर,



अकोले आणि जुन्नर तालुक्यातील नामांकित लेझीम संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघ दोन डाव सादर करून आपल्या कौशल्यपूर्ण खेळाचे दर्शन घडवणार आहे.

या स्पर्धेमध्ये विजयी संघांना क्रमानुसार रोख बक्षिसे व स्मृतिचिन्हे देण्यात येणार असून उर्वरित सर्व संघांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जाणार आहेत. विशेष म्हणजे महिलांच्या लेझीम संघांचाही उत्स्फूर्त सहभाग असणार असल्याने स्पर्धेला अधिकच रंगत येणार आहे.

### संध्याकाळी सोंगी व पारंपरिक लोककला कार्यक्रम

सायंकाळी यात्रेत सोंगी व पारंपरिक लोककलांचा कार्यक्रम होणार असून गावातील पारंपरिक कलाकार आपली कला सादर करणार आहेत. यात्रेचा हा भाग विशेष आकर्षणाचा मानला जातो.

### कुस्त्यांचा जंगी हंगामा

यात्रेतील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे कुस्त्यांचा जंगी हंगामा. नामांकित पैलवानांच्या उपस्थितीत पारंपरिक कुस्त्या रंगणार असून हजारो प्रेक्षक या मैदानावर उपस्थित राहतात. ग्रामीण क्रीडापरंपरेचा हा एक मोठा उत्सव मानला जातो.

### भक्तिभाव, परंपरा आणि सांस्कृतिक जल्लोषाचा संगम

श्री लिंगेश्वर महादेवाची ही यात्रा म्हणजे भक्ती, परंपरा आणि सांस्कृतिक जल्लोषाचा अद्भुत संगम आहे. वर्षानुवर्षे चालत आलेली ही परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने जपली जात आहे. लिंगदेव ग्रामस्थ आणि श्री लिंगेश्वर देवस्थान संस्था यांच्या सहकार्याने यात्रेचे नियोजन उत्तम प्रकारे करण्यात आले आहे. गुढीपाडव्याच्या या पवित्र दिवशी श्री लिंगेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांना आध्यात्मिक समाधान, श्रद्धेचा अनुभव आणि सांस्कृतिक आनंद मिळणार आहे. लाखो भक्तांच्या उपस्थितीत हा यात्रा महोत्सव २०२६ मध्येही भव्य आणि अविस्मरणीय ठरणार आहे.

शब्दांकन -
विक्रम सरूजी पवार, लिंगदेव



गुढी पाडवा
निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...!
दैनिक युवावार्ता
वर्धापनदिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
सौरभ विवेक कासार
नगरसेवक,
संगमनेर नगरपरिषद
संचालक,
किसान कृषी सेवा केंद्र, संगमनेर


अनिकेत बॅटरी हाऊस
- आम्ही तुम्हाला प्रकाशात ठेवतो -
सर्व प्रकारच्या बॅटरीज, इन्व्हर्टरची
कामे खात्रीशीर केली जातील .
स्पेशल सुट
फ्री होम डिलिव्हरी
अनिकेत बॅटरी हाऊस मधून
घेतलेली इन्व्हर्टर बॅटरी पाहून
फॅन सुध्दा म्हणतो
मैं रूकेगा नही साला
EXIDE
EXIDE InvaPlus
INVARED
प्रो.प्रा. अनिकेत वाकचौरे
8888 280 640 8208 177 891
राजमाता जिजाऊ मार्ग, त्रिमूर्ती चौक, मालदाड रोड, संगमनेर 422605


नोकरीची
सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर....................... 03
We are HIRING!
भंडारी
क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर ,
संगमनेर

विधीमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६, मुंबई स्पेशल

# कार्यसम्राट डॉ. किरण लहामटे : अकोल्याच्या विकासाचा ध्यास घेतलेले जनतेचे खरे नेतृत्व



अकोले तालुका अहिल्यानगर जिल्ह्यातील डोंगरदऱ्यांनी वेढलेला, आदिवासी बहुल आणि अनेक मूलभूत गरजांसाठी वर्षानुवर्षे संघर्ष करणारा हा भाग. या तालुक्याच्या विकासाची कथा लिहायची झाली, तर ती केवळ योजनांची किंवा निधीची आकडेवारी नसून, ती एका नेतृत्वाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची कहाणी आहे. या कथानकाच्या केंद्रस्थानी उभे राहतात कार्यसम्राट आमदार डॉ. किरण लहामटे-एक असे व्यक्तिमत्त्व, ज्यांनी केवळ राजकारण केले नाही, तर जनसेवेचा एक वेगळा मापदंड निर्माण केला.

गेल्या काही वर्षांत अकोले तालुक्यातील जनतेने अनुभवलेला बदल हा अचानक घडलेला नाही. त्यामागे आहे सातत्याने काम करणारा, प्रत्येक प्रश्नाला भिडणारा आणि प्रशासनाला उत्तरदायी धरणारा एक नेता. डॉ. लहामटे यांची कार्यपद्धती ही पारंपरिक राजकारणाच्या चौकटीत बसणारी नाही. ती अधिक थेट, लोकाभिमुख आणि परिणामकारक आहे. म्हणूनच त्यांची ओळख 'जनसामान्यांचा नेता' अशी निर्माण झाली आहे.

डॉ. किरण लहामटे यांच्या नेतृत्वाची पहिली ठळक बाब म्हणजे त्यांची स्वच्छ प्रतिमा आणि पारदर्शक कारभार. आजच्या राजकारणात 'स्वच्छता' ही केवळ घोषवाक्यापुरती मर्यादित राहिली आहे, अशा काळात त्यांनी प्रत्यक्ष कामातून ती सिद्ध करून दाखवली. गेल्या पाच वर्षांत त्यांनी विविध प्रश्नांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आणि तो निधी केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष कामांमध्ये रूपांतरित झाला. सुमारे २७०० कोटी रुपयांचा निधी अकोले तालुक्यासाठी आणणे ही केवळ आकड्यांची गोष्ट नाही, तर त्या निधीच्या योग्य वापरातून झालेल्या विकासाची साक्ष आज तालुक्यातील प्रत्येक गाव देत आहे.

कोव्हिड-१९ सारख्या अभूतपूर्व संकटाच्या काळात अनेक ठिकाणी प्रशासन गोंधळलेले असताना, डॉ. लहामटे यांनी जनतेसाठी एक आधारस्तंभ म्हणून काम केले. आरोग्यसेवा, औषधोपचार, रुग्णवाहिका, रुग्णालयांची व्यवस्था या सर्व बाबींमध्ये त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना आर्थिक मदत मिळवून दिली. संकटाच्या काळात जो नेता जनतेसोबत उभा राहतो, तोच खऱ्या अर्थाने जनतेच्या मनात स्थान निर्माण करतो-हे त्यांनी सिद्ध केले.

'जनसामान्यांचा नेता' ही त्यांची ओळख केवळ शब्दांपुरती मर्यादित नाही. चहाच्या टपरीवर बसून लोकांशी संवाद साधणारा, त्यांच्या अडचणी ऐकणारा आणि त्या तात्काळ सोडवण्याचा प्रयत्न करणारा नेता म्हणून त्यांनी स्वतःची प्रतिमा तयार केली आहे. राजकारणातील दुरावा त्यांनी कधीच स्वीकारला नाही. म्हणूनच आज अकोल्यातील सर्वसामान्य माणूसही निर्धास्तपणे म्हणतो- आपला आमदार आपल्यातलाच आहे. त्यांच्या काम करण्याच्या शैलीतील सर्वात प्रभावी घटक म्हणजे 'जनता दरबार'. निवडून आल्यानंतर अवघ्या काही दिवसांत त्यांनी पुन्हा जनता दरबार सुरू केला, ही बाब त्यांच्या बांधिलकीची साक्ष देते. या माध्यमातून हजारो लोकांच्या समस्या थेट त्यांच्या समोर येतात आणि त्या तातडीने सोडवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले जातात. ही पद्धत केवळ समस्या ऐकण्यापुरती मर्यादित नसून, त्यावर तत्काळ कृती करण्याची प्रणाली आहे. त्यामुळेच अकोल्याच्या जनतेला एक सक्षम आणि उत्तरदायी नेतृत्व मिळाले आहे.

डॉ. लहामटे यांच्या नेतृत्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा बाणेदारपणा आणि कणखर भूमिका. आदिवासी समाजाचे प्रश्न मांडताना त्यांनी कधीही तडजोड केली नाही. आदिवासी आरक्षणाच्या प्रश्नावर त्यांनी घेतलेली आक्रमक भूमिका ही त्यांच्या जिद्दीचे प्रतीक आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याची तयारी आणि समाजाच्या हक्कांसाठी कोणत्याही टोकाला जाण्याची मानसिकता हीच त्यांना वेगळे स्थान देते. अकोले तालुका हा आदिवासी बहुल असल्यामुळे, त्या समाजाच्या प्रश्नांची जाणीव असणे आणि त्यासाठी काम करणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. लहामटे यांनी हे केवळ कर्तव्य म्हणून केले नाही, तर त्यामागे एक 'भूक' आहे- आदिवासी समाजाच्या उन्नतीची भूक. घरकुल योजना, शिक्षण, आरोग्य, रोजगार या सर्वच क्षेत्रांत त्यांनी आदिवासी भागाला प्राधान्य दिले. आश्रमशाळांमध्ये विज्ञान केंद्रांची उभारणी, विद्यार्थ्यांसाठी वाचनालयांची निर्मिती, दुर्गम भागात रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे-या सर्व उपक्रमांमधून त्यांनी त्या समाजाच्या प्रगतीसाठी केलेला प्रयत्न स्पष्ट दिसतो.

विकासाच्या पायाभूत सुविधांमध्ये त्यांनी केलेली कामेही तितकीच उल्लेखनीय आहेत. १७ वर्षे रखडलेल्या पिंपरकणे पुलाचे लोकार्पण करून त्यांनी केवळ एक प्रकल्प पूर्ण केला नाही, तर अनेक गावांच्या संपर्काचा प्रश्न कायमचा सोडवला. अकोले बसस्थानकाचे नूतनीकरण, बाजारतळाचा कायापालट, नवीन रस्ते आणि पूल यांची निर्मिती या कामांमुळे तालुक्याचा चेहरामोहरा बदलू लागला आहे. पाण्याच्या प्रश्नावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. २९ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, ४५ पाझर तलाव आणि ७२ साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती ही कामे केवळ आकडे नाहीत, तर त्यामागे शेतकऱ्यांच्या आयुष्यात आलेला बदल आहे. पाणी साठवणुकीच्या या उपाययोजनांमुळे शेतीला पाणी मिळू लागले, उत्पादन वाढले आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढण्यास मदत झाली.

आरोग्य क्षेत्रातही त्यांनी मोठे पाऊल उचलले. अकोले येथे उपजिल्हा रुग्णालय, राजूर येथे १०० बेडचे विशेष रुग्णालय आणि शेंडी बोटा येथे ग्रामीण रुग्णालय यांसारख्या प्रकल्पांना मंजुरी मिळवून त्यांनी आरोग्यसेवेची पायाभरणी मजबूत केली. दुर्गम भागात ११ रुग्णवाहिकांचे लोकार्पण करून त्यांनी 'वेळीच उपचार' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. शिक्षण क्षेत्रात त्यांनी घेतलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना नवीन संधी मिळू लागल्या. जिल्हा परिषद शाळांमध्ये नवीन वर्गखोल्या, स्पर्धा परीक्षांसाठी वाचनालये, आश्रमशाळांमध्ये विज्ञान केंद्रे-या सर्व गोष्टी ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या आहेत. शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजाचा विकास होतो, ही जाणीव त्यांच्या कामातून स्पष्टपणे दिसते.

त्यांच्या नेतृत्वातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे 'समन्वय साधण्याची कला'. राजकारणात अनेकदा मतभेद निर्माण होतात, परंतु सर्वांना सोबत घेऊन काम करणे हे खरे नेतृत्व असते. डॉ. लहामटे यांनी ही कला आत्मसात केली आहे. कोणाचेही मन न दुखावता, सर्व घटकांना एकत्र आणून विकासाची गती कायम ठेवण्याची त्यांची क्षमता ही त्यांची मोठी ताकद आहे. सामाजिक आणि धार्मिक पातळीवरही त्यांनी विविध कामे केली आहेत. वाड्या-वस्त्यांमध्ये मंदिरांसाठी सभामंडप, बुद्ध विहारांची उभारणी, कब्रस्तान परिसरातील सुविधा-या कामांमधून त्यांनी सर्व समाजघटकांचा विचार केला आहे. विकास हा सर्वसमावेशक असावा, ही भूमिका त्यांनी सातत्याने जपली आहे.

आज अकोले तालुक्यातील सामान्य नागरिकांच्या मनात एक विश्वास निर्माण झाला आहे- आपला नेता काम करतो. हा विश्वास निर्माण होण्यासाठी केवळ भाषण पुरेसे नसते; त्यासाठी सातत्याने काम करावे लागते, लोकांशी संवाद ठेवावा लागतो आणि त्यांच्या समस्यांना प्राधान्य द्यावे लागते. डॉ. किरण लहामटे यांनी हे सर्व करून दाखवले आहे. याच पार्श्वभूमीवर आज अनेक अकोलेकरांच्या मनात एक भावना स्पष्टपणे दिसते डॉ. लहामटे यांना मंत्रीपदाची जबाबदारी मिळावी. त्यांच्या स्वच्छ प्रतिमेचा, काम करण्याच्या पद्धतीचा, जनसामान्यांशी असलेल्या नात्याचा आणि आदिवासी समाजासाठी असलेल्या बांधिलकीचा विचार करता, ते मंत्रीपदाला पूर्णपणे न्याय देऊ शकतात, असे मत व्यक्त होत आहे. विशेषतः आदिवासी विकास मंत्रालयाची धुरा त्यांनी सांभाळली, तर केवळ अकोलेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासी भागाला नवी दिशा मिळू शकते.

एक ज्येष्ठ पत्रकार म्हणून या सर्व कार्याचा आढावा घेताना असे स्पष्टपणे जाणवते की, डॉ. किरण लहामटे यांचे नेतृत्व हे 'प्रचारापेक्षा कामावर विश्वास ठेवणारे' आहे. त्यांनी केलेली कामे, घेतलेले निर्णय आणि जपलेली मूल्ये ही त्यांची खरी ओळख आहेत. अकोले तालुक्याच्या विकासाच्या इतिहासात त्यांचे नाव एक महत्त्वाचा टप्पा म्हणून नोंदले जाईल, यात शंका नाही. आगामी काळातही त्यांनी हाच वेग आणि हीच तळमळ कायम ठेवली, तर अकोले तालुका केवळ जिल्ह्याच्या नव्हे, तर राज्याच्या विकास नकाशावर ठळकपणे उमटेल- आणि त्या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असतील, कार्यसम्राट आमदार डॉ. किरण लहामटे.

**किशोर आव्हाड**
उपसंपादक, दैनिक युवावार्ता
मोबाईल - 8830508244



अकोले बसस्थानक



पिंपरकणे पूल




लिंगदेव एमआयडीसी मंजूरी



अकोल्याचे नूतन रस्ते



जिल्हा परिषद शाळा इमारती



ग्रामसचिवालय इमारती



वाचनालय, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र



अंगणवाडी इमारती



बहुउद्देशीय सभामंडप




तलाठी कार्यालय



जि.प. नवीन वर्गखोल्या व शैक्षणिक सुविधा



प्राथमिक आरोग्य केंद्रे



# SHRI SAMARTH ENTERPRISES & PRIORITY INFRASTRUCTURE








MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.




Mr. Subodh Bhot     Mr. Kisan Deshmukh

## Government Licensed Electrical Contractor

**Director - Electrical Contractors' Association of Maharashtra**

*We offer comprehensive Industrial and MSEDCL electrical project solutions, covering consulting, liaisoning, control panels, MCC panels, HT/LT underground cable works, HT/LT transmission lines, transformer erection, 33/11 kV sub-station works, erection, testing, and commissioning with quality and reliability.*



**CONTACT: 9527516191, 7028515200**



गुढी पाडवा
निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...!



दैनिक युवावार्ता वर्धापनदिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !

### INDUSTRIAL

Consulting
Control Panels
MCC- Panels
Erection, Testing & Commissioning
HT/LT- Underground Cable works


### MSEDCL

Consulting, Laisoning
HT/LT-Transmission lines
Transformers erection
33/11 kv Sub-Station works
HT/LT- Underground Cable works

### OFFICE

Office No.07, 2nd Floor,
Gajanan Villa, Near Pariwar
Kirana Bazar, Akole Road,
Sangamner-422605

# स्वराज्य संकल्पक शाहजीराजे भोसले! संगमनेरच्या मातीचे खरे वैभव



18 मार्च
शाहजीराजे भोसले
जयंती विशेष

राजू दिवाकर दीक्षित,
पेमगिरी, संगमनेर
मो. ९७६३६२१९६२





छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य म्हटले की आपल्या मनात रायगडाचे सिंहासन, तोरण्याचा विजय, अफजलखानवध आणि हिंदवी स्वराज्याची गर्जना घुमते. पण या तेजस्वी इतिहासाची पहिली ठिणगी कुठे पडली, हा प्रश्न विचारला तर उत्तर सह्याद्रीच्या शांत कुशीत दडलेल्या संगमनेरजवळील पेमगिरीच्या शाहगडावर!

आज ज्या दुर्गावर वारा आणि निसर्ग, खंबाटकी टाकी, पेमादेवीचे पुरातन मंदिर व जुन्या भिंतींचे काही अवशेष शिल्लक आहेत, त्याच किल्ल्यावर १६३३ च्या ऋषीपंचमीला एक अशी घटना घडली ज्याने दख्खनच्या राजकारणाला हादरा दिला आणि स्वराज्याच्या विचाराला अंकुर फुटला. या घटनेचे शिल्पकार होते - शाहजी राजे भोसले.

शाहजी महाराजांच्या जयंतीनिमित्त या विस्मृतीत गेलेल्या पण दख्खनच्या भूमीतील निर्णायक प्रसंगाचे स्मरण करणे म्हणजेच स्वराज्याच्या मुळांपर्यंत जाणे होय. हिंदवी स्वराज्य संकल्पक शाहजी महाराजांना अभिवादन करायचे तर या गडावर जायलाच हवे!

सतराव्या शतकाच्या सुरुवातीला दख्खन प्रदेश प्रचंड अस्थिरतेत होता. दुष्काळाच्या स्वरूपात आस्मानी संकट मराठी माणसांची परीक्षा पाहत होता, मुघल साम्राज्य अक्राळविक्राळ रूप धारण करीत दक्षिणेकडे सरकत होते, अहमदनगरची (आजचे अहिल्यानगर) निजामशाही कोसळत होती. विजापूरची आदिलशाही असुरक्षिततेच्या भयाने पछाडलेली होती. या शाह्यांच्या युद्धांमध्ये सर्वाधिक त्रास सामान्य जनतेला सहन करावा लागत होता. लूटमार, जाळपोळ, स्त्रियांवरील अनन्वित अत्याचार, जबरदस्तीचे कर, असुरक्षितता, भीती, निराशा यामुळे सामान्य जनता हवालदिल झाली होती.

अशा वेळी बहुतेक मराठी सरदार मुघल किंवा आदिलशहा यांचे दरबारी रुजू होण्याचा सुरक्षित मार्ग शोधत होते. पण शाहजी महाराजांनी वेगळा मार्ग निवडला; तो म्हणजे प्रतिकाराचा, निजामशाहीच्या सामान्य जनता, सरदार व इतर शाह्या यांच्या मनात असलेल्या अधिकृततेचा उपयोग करून घेत पेमगिरीच्या शाहगडावर घेतलेल्या हिंदवी स्वराज्य संकल्पाचा!

शाहजी महाराजांनी निजामशाहीच्या वंशातील मूर्तजा या बालक वारसाला मांडीवर घेऊन संगमनेर तालुक्यातील पेमगिरीच्या शाहगडावर गादीवर बसवले. हा केवळ राजकीय निर्णय नव्हता; तो जगाला दिलेला संदेश होता! सत्ता संपलेली नाही, स्वाभिमान जिवंत आहे. दख्खनची अस्मिता संपलेली नाही. मुघलांच्या प्रचंड शक्तीसमोर उभे राहणे म्हणजे अंगार अंगावर घेण्यासारखे होते. कोणाच्याही मनाला शिवणार नाही असा विचार!

एक हिंदू व्यक्ती राज्य चालवू शकतो; हे अशक्य मानले जात होते. तरीही शाहजी महाराजांनी पराभव स्वीकारला नाही. ते खचले नाहीत, निराश झाले नाहीत. मुघल साम्राज्यापुढे ठामपणे उभे राहिले. त्या क्षणी पेमगिरी हा केवळ एक दुर्ग नव्हता तर तो होता आशेचा दीपस्तंभ!

पेमगिरीच्या शाहगडावर भव्य राजवाडे नव्हते, मोठे सैन्य नव्हते, संपत्ती नव्हती. पण होते धैर्य, दूरदृष्टी, लांबपर्यंत लक्ष ठेवता येईल अशी डोंगररांग आणि स्थानिक अठरा पगड जातींच्या समाजाचा विश्वास! दुर्गावर पेमादेवीच्या मंदिरामागे छोटेखानी दरबार उभा राहिला. सैनिकांची वर्दळ सुरू झाली. आसपासच्या गावांतून अन्न व रसद पोहोचू लागली. पराभूत सत्तेच्या राखेतून नवजीवन निर्माण होत होते.

पेमगिरीच्या या प्रयोगाचा सर्वात मोठा परिणाम समाजमनावर झाला. लोकांनी प्रथमच पाहिले की मोठ्या साम्राज्यांना पूर्णतः शरण जाणे अपरिहार्य नाही. शेतकरी, कुणबी, रामोशी, आदिवासी, बलुतेदार, कारागीर, ब्राह्मण या सर्वांनी या व्यवस्थेला आधार दिला. त्यांच्या मनात एक नवी भावना निर्माण झाली, आपल्यातीलच कोणी हिंदू माणूस मोठ्या सत्तेला आव्हान देऊ शकतो.

हा आत्मविश्वास पुढे स्वराज्याच्या लढ्यात निर्णायक ठरला. भीतीचे रूपांतर धैर्यात झाले. मुघल साम्राज्याच्या अजेयतेला तडा गेला. पेमगिरीच्या प्रयोगाने भीतीला आव्हान दिले गेले.

लोकांनी पाहिले की डोंगरांवरून प्रतिकार शक्य आहे, लहान सैन्यही मोठ्या सत्तेला अडवू शकते, पराभव अंतिम नसतो! ही मानसिक क्रांती पेमगिरीच्या हिंदवी स्वराज्य संकल्पाची मराठी माणसाला मिळालेली सर्वात मोठी देण होती कारण स्वराज्य आधी मनात जन्मते, नंतर रणांगणात! शाह्यांच्या परंपरेतून स्वनिर्मित स्वराज्याकडे प्रवासासाठीचे पहिले पाऊल उचलले गेले.

पेमगिरीत शाहजी महाराजांना स्वतः राजा होण्याचा प्रयत्न करता आला असता मात्र त्यांनी परंपरागत मान्यतेचा आधार घेतला. स्वतः वजीर होऊन राज्यकारभार पाहू लागले. मराठी सरदारांचा आत्मविश्वास दुणावला. छत्रपती शिवाजी महाराजांसाठी हा अनुभव फार मोलाचा ठरला. शिवाजी महाराजांनी पुढे परंपरेची चौकट मोडून स्वतःचे स्वतंत्र हिंदवी स्वराज्य उभे केले. रायगडावर राज्याभिषेक करून त्यांनी स्वतःला सार्वभौम राजा घोषित केले. पेमगिरी ते रायगड हा प्रवास म्हणजे एक उत्क्रांती होती. आणि पेमगिरीचा संकल्प म्हणजे परावलंबित्वातून स्वनिर्मित हिंदवी स्वराज्याकडे झालेल्या उत्क्रांतीचा प्रारंभ होता!

१६३६ साल उजाडले. प्रयोग संपला, विचार नाही संपला! मुघल आणि आदिलशाही यांच्यातील तहामुळे निजामशाहीचा अंत झाला. पेमगिरीवरील व्यवस्था टिकू शकली नाही. शाहजी महाराजांना दक्षिणेकडे जावे लागले.

### २) *मआसिर-उल-उमरा* (शाहनवाज खान)

**उतारा**

“شاهجی بهوسله در کوهستانات
احمدنگر علم مخالفت برافراشت و
مرتضی را به پادشاهی برداشت، و
خود متصرف امور گشت.”

**अर्थ**

“शहाजी भोसले यांनी अहमदनगरच्या डोंगराळ प्रदेशात बंडाचे निशाण उभारले, मूर्तजाला राजेपदावर बसविले आणि स्वत: कारभार हातात घेतला.”

### ४) मुघल दरबारी पत्रव्यवहार (शाहजहान → खान-ए-दौरान)

काही संपादित पत्रसंग्रहांमध्ये (उदा. *Ruq'āt-i-'Alamgiri* पूर्वकालीन संकलनांतील संदर्भ) शहाजीविरुद्ध मोहिमेचे आदेश दिसतात:

“باید که شاهجی را که در
کوهستانات پمگیری فتنه انگیخته،
به زودی سرکوب نمایند...”

अर्थ: “पेमगिरीच्या डोंगरांत उठाव करणाऱ्या शहाजीस त्वरित दडपावे.”

«مصلحت آن است که به اتفاق،
ریشهٔ این فتنه برکنده شود، والا
آتش آن به حدودِ دولتِ شما نیز
سرایت خواهد کرد.»[2]

*(हिताचे असे आहे की आपण एकत्रितपणे या बंडाचे मूळ उपटून टाकावे; अन्यथा त्याची ज्वाला तुमच्या राज्यसीमांनाही ग्रासेल.)*

राजकीयदृष्ट्या हा तह होता. पण इतिहासाच्या दृष्टीने ते अपयश नव्हते. तो प्रयोग होता, तो प्रारंभ होता, तो अनुभव होता! स्वराज्यासाठी तयार झालेले पायाभूत तत्त्व संगमनेरच्या मातीत जन्माला आले होते. येथे मिळालेले धडे पुढे शिवाजी महाराजांच्या कार्यात साकार झाले.

दुर्ग आधारित सत्ता, गतिमान युद्धतंत्र, स्थानिक गोरगरीब जनतेचा आधार, स्वाभिमानावर आधारित सत्ता आणि संकटात टिकून राहण्याची क्षमता ही सर्व तत्त्वे म्हणजे संगमनेर, पेमगिरीच्या मातीने स्वराज्याला दिलेली देण होय! शिवाजी महाराज त्या वेळी ३ वर्षांचे होते. बाल्यावस्थेत जिजाबाईंचे संस्कार आणि शाहजी महाराजांचे अनुभव यांच्या माध्यमातून हा विचार त्यांच्या मनात पक्का रुजला. १६४६ मध्ये तोरणा किल्ला जिंकणे ही त्या विचाराची पहिली ठोस कृती ठरली.

पेमगिरीत सत्ता टिकवण्याचा प्रयत्न होता; तोरण्यात सत्ता निर्माण करण्याची सुरुवात झाली. आणि रायगड त्या ठिणगीचे दैदिप्यमान रूप होते! तोरणा ते राजगड आणि नंतर रायगड हा प्रवास केवळ किल्ल्यांचा नव्हता; तो मराठी माणसाच्या आत्मविश्वासाच्या वाढीचा प्रवास होता.

१६७४ साली रायगडावर राज्याभिषेक झाला तेव्हा हिंदवी स्वराज्य साकार झाले. पण त्या तेजस्वी सूर्याची पहिली किरणे पडली होती १६३३ सालच्या ऋषीपंचमीच्या सकाळी पेमगिरीच्या शाहगडावर!

शाहजी महाराज छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील म्हणून मोठे तर होतेच; पण ते दूरदर्शी राजकारणी, कुशल सेनानी, स्वाभिमानी नेता आणि स्वराज्य संकल्पनेचे प्रणेते होते.

पेमगिरीचा प्रयोग त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वोत्तम उदाहरण आहे. पेमगिरी, संगमनेरचा इतिहास आपल्याला सांगतो आहे - संकटातही आशा सोडू नका, लहान ठिणगी मोठी ज्वाला बनू शकते, समाज एकत्र आला तर परिवर्तन घडते, स्वाभिमान हीच खरी शक्ती आहे! आजच्या अस्थिर जगात आणि हिंदू धर्मासाठी हा संदेश अधिकच महत्त्वाचा आहे.

पेमगिरी (संगमनेर) म्हणजे स्वराज्याचा पहिला श्वास!

पेमगिरीच्या शाहगडावर पडलेली ठिणगी काही वर्षे सुप्तावस्थेत गेली खरी पण ती विझली नाही. या घटनेने आणि विचाराने इतिहासाचा मार्ग बदलला! त्या ठिकाणी पेटलेली ठिणगी स्वाभिमानाची होती. याच ठिणगीची पुढे तोरण्यात ज्वाला बनली, राजगडावर स्थिर तेजस्वी सूर्याप्रमाणे प्रकट झाली! म्हणूनच स्वराज्याचा इतिहास समजून घ्यायचा असेल तर संगमनेर, पेमगिरी विसरून चालणार नाही! शाहजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना आपण हे लक्षात ठेवूया - ‘स्वराज्याचा सूर्य रायगडावर तळपला पण त्याची पहाट पेमगिरीत झाली होती!’ आणि त्या पहाटेचे शिल्पकार होते महापराक्रमी, दूरदर्शी, स्वाभिमानी शाहजी राजे भोसले!

आज १८ मार्च, हिंदवी स्वराज्य संकल्पक शाहजी महाराजांची जयंती!

त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांना खरे अभिवादन करायचे असेल तर शाहगडावर त्यांचे सिंहासनाधिष्ठित स्मारक उभे करण्याचा संकल्प आपण घ्यायलाच पाहिजे!

# तीन पिढ्यांची मेहनत; ‘राजेंद्र उद्योग’च्या विश्वासाचा वारसा






श्री. श्रीनिवासजी सोमाणी उर्फ रामभाऊ यांच्या छोट्याशा ८ बाय ६ फूटाच्या दुकानातून सुरू झालेला प्रवास आज केवळ एका दुकानापुरता मर्यादित न राहता ‘राजेंद्र’ या नावाला उद्योगसमूहाचे व्यापक रूप देणारा ठरला आहे. आज राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स हे नाव केवळ कापड व्यवसायापुरते मर्यादित नसून वाहन, फर्निशिंग, कृषी आणि विविध क्षेत्रांत विस्तारलेले यशस्वी ब्रँड म्हणून ओळखले जाते.

सोमाणी कुटुंबातील श्रीनिवासजी आणि राजाभाऊ ही जोडी जणू राम-लक्ष्मणासारखी एकमेकांची साथ देत उभी राहिली. पहिल्या पिढीत कृषी आणि कापडाचा संगम, दुसऱ्या पिढीत लक्ष्मी-सरस्वतीचा समतोल आणि तिसऱ्या पिढीत आधुनिक तंत्रज्ञानाची झेप - असा सुंदर विकासक्रम या परिवारात दिसतो. शिक्षण, संस्कार आणि व्यवसायातील दृष्टीकोन यांचा उत्तम मिलाफ या कुटुंबाच्या प्रगतीचा पाया ठरला आहे.

राजाभाऊ (राजेंद्र) यांनी पदवी घेतल्यानंतर व्यवसायाची धुरा स्वीकारली. दुसऱ्या पिढीतील संजय, कैलास (सीए), सचिन व ओंकार आणि तिसऱ्या पिढीतील अनुप व नकुल या सर्वांनी विविध क्षेत्रांत पुढाकार घेत उद्योगसमूहाला आधुनिक दिशा दिली. आज हे सर्वच सोमाणी परिवाराचे हिरे आणि उद्योगाचे आधारस्तंभ ठरले आहेत.

**साधेपणातून उभा राहिलेला भव्य प्रवास -**

आजोबा पन्नालालजी व बंसीलालजी यांच्या अर्थार्जनाची सुरुवात नोकरीतून झाली. सोलापूर, गुळेदगुडु आणि बनारस येथील पेढ्यांवर काम करत त्यांनी अनुभव घेतला. त्यानंतर १९३६ मध्ये संगमनेर बाजारपेठेत भाड्याने छोटंसं कापड दुकान सुरू केलं. त्या काळात दुकानदारीची पद्धत वेगळीच होती-ओट्यावर उभं राहून ग्राहकांना हाका मारायच्या, दीर्घ घासाघीस करायची आणि बहुतेक वेळा उधारीवर व्यवहार करावा लागायचा.

रामभाऊंना मात्र ही पद्धत मान्य नव्हती. त्यांनी व्यवसायात नवा दृष्टिकोन आणण्याचा निर्णय घेतला आणि १९५९ मध्ये मेनरोडवरील घराच्या कोपऱ्यात छोटं पण वेगळं दुकान सुरू केलं. घरातील सर्वात लहान राजेंद्रच्या नावावरून दुकानाला ‘राजेंद्र’ हे नाव दिलं.

या दुकानाचं सर्वात मोठं वैशिष्ट्य होतं - ‘फिक्स रेट’. त्या काळात एकच भाव असलेलं दुकान ही मोठी क्रांती होती. सुरुवातीला शंका व्यक्त करणारेही होते, पण रामभाऊंचा आत्मविश्वास ठाम होता-चांगला माल, योग्य नफा आणि प्रामाणिक व्यवहार यामुळे ग्राहक परत येणारच. आणि तसंच झालं. ग्राहक चार ठिकाणी फिरून शेवटी परत ‘राजेंद्र’मध्ये येऊ लागले.

**बदलत्या काळाशी जुळवून घेतलेली वाटचाल -**

कापडाबरोबर रेडीमेड कपडे ठेवण्याचा निर्णयही त्या काळात धाडसी होता. रेडीमेड म्हणजे कमी दर्जाचे, असे समजले जायचे. पण रामभाऊंनी गुणवत्तेवर भर दिला. उत्तम कापड, मजबूत शिलाई, स्वतः डिझाईन केलेले पॅटर्न आणि स्वतःच्या देखरेखीखाली तयार होणारे कपडे-या सर्वांमुळे ग्राहकांचा विश्वास वाढू लागला. मागणी वाढत गेली तसे सोलापूर, पुणे, इंदोर येथून माल खरेदी सुरू झाली आणि नंतर थेट मिलमधून खरेदी होऊ लागली. दुकानाचा विस्तार होत गेला. घरातील जागा अपुरी पडू लागली. १९९० मध्ये इंदिरानगर येथे राहायला जाऊन पूर्ण इमारत दुकानासाठी वापरली गेली. पुढे १५ ऑगस्ट १९९७ रोजी अधिक मोठ्या नवीन जागेत स्थलांतर झाले. जुन्या दुकानात फर्निशिंग, कार्पेट, मॅट्स यांची स्वतंत्र दालने सुरू झाली. ६४ स्क्वेअर फुटांपासून सुरू झालेला प्रवास हजारो स्क्वेअर फुटांपर्यंत पोहोचला.

**कृषी, समाजकार्य आणि मूल्यांची परंपरा -**

१९८६ मध्ये रामभाऊंनी शेवगाव येथील माळरानावरील शेतीकडे लक्ष दिले. १८ एकरांपासून सुरू झालेली शेती १३१ एकरांपर्यंत विस्तारली. अथक परिश्रमाने उजाड माळरान हिरव्यागार नंदनवनात बदलले. रामभाऊंनी शेतीकडे लक्ष द्यायला सुरुवात केल्यानंतर राजेंद्र (राजाभाऊ) यांनी व्यवसायाची संपूर्ण धुरा यशस्वीपणे सांभाळली. व्यवसायातील सचोटी, प्रामाणिकपणा, सखोल ज्ञान आणि राजाभाऊंचा मनमिळाऊ, मृदू आणि विनम्र स्वभाव यामुळे व्यवसायाने प्रगतीचा अधिक उंच टप्पा गाठला. राजाभाऊ सध्या ७३ वर्षांचे असले तरीही एखाद्या तरुणाला लाजवेल अशा उर्जेने ते विविध विभागांची खरेदी-विक्री पाहतात. ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी त्यांचा सतत प्रयत्न असतो. वेळोवेळी ते पुढील पिढीला मार्गदर्शन करतात. कापड व्यवसायातील विस्तारासोबतच या परिवाराने होंडा टू व्हीलर्सची डिलरशिप घेऊन ऑटोमोबाईल क्षेत्रात पदार्पण केले. या क्षेत्राचा कोणताही पूर्वानुभव नसताना ओंकार सोमाणी यांनी कैलास सोमाणी यांच्यासोबत अभ्यासपूर्वक या व्यवसायाला उंचीवर नेत होंडा कंपनीकडून अनेक पुरस्कारांचा मान मिळविला. सोमाणी परिवाराचा आणखी एक मोठा पैलू म्हणजे समाजकारण. ग्रामीण शैक्षणिक संस्था, मंदिर उभारणी, धार्मिक कार्यक्रम, स्पर्धा - अशा अनेक उपक्रमांना त्यांनी सढळ हाताने मदत केली. कष्टाने कमावलेला पैसा योग्य कार्यासाठी वापरणे हा त्यांचा जीवननियम राहिला. दिखाऊपणा, बडेजाव, दांभिकता यापासून दूर राहून प्रामाणिकपणा, कष्ट, त्याग आणि समर्पण या मूल्यांवर उभे राहिलेले हे कुटुंब समाजासाठी आदर्श ठरले.

**आधुनिकतेकडे झेप -**

जागतिकीकरणानंतर कपड्यांच्या आवडी-निवडींमध्ये मोठा बदल झाला. पारंपरिक पोशाखांबरोबर ब्लेझर्स, कोट-सूट, टाय, विविध प्रकारच्या साड्या यांची मागणी वाढली. बदलत्या काळाची गरज ओळखून दुकानाचा आणखी विस्तार करण्यात आला. तरुणांसाठी स्वतंत्र ‘राजेंद्र फॅशन्स’ संकल्पना राबवली गेली. संजय, कैलास, सचिन, ओंकार या पिढीने परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम साधत व्यवसायाला नव्या उंचीवर नेले. व्यवसायाच्या या संपूर्ण प्रवासात सोमाणी परिवाराला द्वारकानाथजी बंग आणि विनोद बंग यांची प्रामाणिक व मोलाची साथ लाभली.

**ग्राहकसेवा - ईश्वरसेवा -**

ग्राहकसेवा हीच ईश्वरसेवा हे तत्त्व आजही व्यवसायाचा केंद्रबिंदू आहे. सचोटी हा आत्मा, जिद्द-चिकाटी ही वृत्ती आणि प्रगतीची आस हा स्वभाव - या गुणांमुळे ‘राजेंद्र’ प्रत्येक ग्राहकाच्या मनात स्थान मिळवतो. आज ४०,००० स्क्वेअर फुटांच्या भव्य जागेत स्त्रिया, तरुणी, मुले, युवक, प्रौढ यांच्यासाठी स्वतंत्र दालने, साड्यांचे विशाल विभाग, नववधूंसाठी विशेष कलेक्शन, वरांसाठी शेरवाणी-सूट-ब्लेझर्स उपलब्ध आहेत. तसेच आधुनिक काळातील बदलत्या मागणीनुसार सुरू केलेल्या राजेंद्र होम डेकोर अंतर्गत फर्निशिंग, पडदे, गालीचे, कार्पेट्स, मॅट्स, सोफासेट आणि घर सजावटीच्या सर्व वस्तू उपलब्ध आहेत. राजेंद्र होम डेकोरची शाखा अहील्यानगर येथे देखील सुरू केली आहे. नगर जिल्हा आणि परिसरातील प्रत्येक ग्राहकासाठी ‘राजेंद्र’ हे विश्वासाचं, गुणवत्तेचं आणि वाजवी किमतीचं प्रतीक बनलं आहे.

**प्रेरणादायी वारसा -**

६४ स्क्वेअर फुटांपासून सुरू झालेला प्रवास आज हजारो स्क्वेअर फुटांच्या साम्राज्यात परिवर्तित झाला. पण या प्रवासात एक गोष्ट कायम राहिली-प्रामाणिकपणा, ग्राहकांविषयीची आपुलकी आणि गुणवत्तेची तडजोड न करणे. तीन पिढ्यांच्या अनुभवातून तयार झालेला ग्राहकांशी असलेला ऋणानुबंध आजही अधिक दृढ होत आहे. उत्तम दिसणारा, टिकणारा आणि वाजवी दरात मिळणारा कपडा म्हणजे ‘राजेंद्र’ - हा विश्वास लोकांच्या मनात रुजला आहे. सेवा, सचोटी, वाजवी दाम आणि माणुसकी यांच्या बळावर उभा राहिलेला हा उद्योग आज केवळ व्यवसाय नाही, तर एक प्रेरणादायी प्रवास आहे कष्ट, दूरदृष्टी आणि मूल्यांवर उभ्या राहिलेल्या कुटुंबाच्या यशाची उज्ज्वल कहाणी.

संजय आहिरे
उपसंपादक,
दैनिक युवावार्ता, संगमनेर

गुरूवार
१९
मार्च २०२६

वर्ष १९ वे
अंक - ६९
पान नं - १२
किंमत - ०६ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25
गुढी पाडव्याच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा !

